# राशिभविष्य - सप्टेंबर २०२३.

दादा दामले(dadadamle@gmail.com)

==================================================

**सूचना -** प्रत्येक राशीच्या राशिभविष्याच्या अखेरीस त्या त्या राशीच्या जन्मनक्षत्रांसाठी असलेला तारक मंत्र दिला आहे. आपल्या जन्मनक्षत्राच्या तारक मंत्राचा उपाय म्हणून मनापासून श्रद्धेने उपयोग केल्यास जीवनात येणाऱ्या अडचणी, अडथळे, व्याधी, पीडा, आजार व अन्य समस्या यांचे निवारण होते, असा अनेकांचा अनुभव आहे. आपणही तसा प्रयत्न करून पाहावा व आपणांसही तसा अनुभव आल्यास कृपया आम्हांस कळवावे.

==================================================

**(१) मेष -** या राशीच्या प्रथम(लग्न) स्थानी याच राशीत गुरु -राहू-हर्षल असे तीन ग्रह असून येथील गुरुमुळे आरोग्य सुधारेल व तो बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. येथील हर्षलमुळे स्वभाव अस्थिर, चंचल, लहरी होईल; पण तो शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होईल.पण येथील राहूमुळे अपमान होतील, त्यातून मनात सूडभावना प्रबळ होईल व काही मंडळींना वातविकाराचा आजार होणे संभवते. या राशीच्या चतुर्थ स्थानी कर्क राशीत शुक्र असून तो सुखकारक व ऐषआरामदायक होईल. शिवाय शेतीवाडी असणारांना त्यापासून लाभ होईल. या राशीच्या पंचम स्थानी सिंह राशीत रवि -बुध असे दोन ग्रह असून हे दोन्ही ग्रह प्रतिकुलच होतील आणि रविमुळे अनारोग्य होणे, प्रिय जनांपासून दूरत्व निर्माण होणे, संततिसुखात बाधा येणे संभवते. पण तो उच्चराशीत असल्यामुळे फारसा प्रतिकुल होण्याची शक्यता दिसत नाही. हा रवि महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या षष्ठ स्थानी कन्या राशीत जात आहे. त्या काळात तो दशम या व्यवसाय स्थानास पूरक होईल. हितशत्रू पराभूत होतील; पण तो अनारोग्यकारक होणेही संभवते. या राशीच्या पंचम स्थानी असलेल्या बुधामुळे संतती,स्त्रीपासून त्रास होणे संभवते. या राशीच्या षष्ठ स्थानी कन्या राशीत प्रथमपासून मंगळ आहेच. त्याच्यामुळे चोरी होणे, इजा होणे, अनारोग्य होणे, अपप्रचाराचा त्रास होणे संभवते. या राशीच्या सप्तम स्थानी तुळा राशीत केतु असून त्याच्यामुळे मनस्थिती अस्थिर राहील व वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येईल. जपा. या राशीच्या लाभस्थानी कुंभ या स्वराशीत शनि असून तो साधारणपणे सुखाचाच होईल व त्याच्यामुळे अर्थलाभ होणेही संभवते. या राशीच्या व्ययस्थानी मीन राशीत नेपच्यून असून त्याच्यामुळे चिंता, मानसिक व्यग्रता होईल; पण तो गुप्त पोलीस खात्यात कार्यरत असणारांना अनुकुल होईल. श्रद्धा असेल तर श्रीगणपतीची उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने “श्रीगणेश अथर्वशीर्ष स्तोत्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र अश्विनी आहे त्यांनी “ओम अश्विनीकुमाराभ्यां नमः:” तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र भरणी आहे त्यांनी “ओम यमाय नमः:” तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र कृत्तिका आहे त्यांनी “ओम अग्नये नमः:” तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(२) वृषभ -** या राशीच्या तृतीय स्थानी कर्क राशीत शुक्र असून त्याच्यामुळे धनलाभ होणे, भूमिलाभ होणे, मान,प्रतिष्ठा प्राप्त होणे अशापैकी घटना घडण्याची शक्यता दिसते. या राशीच्या चतुर्थ स्थानी सिंह राशीत रवि -बुध असे दोन ग्रह असून येथील रवि महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या पंचम स्थानी कन्या राशीत जात आहे. अशा परिस्थितीत तो महिन्याच्या संपूर्ण काळात प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे अनारोग्य, कार्य दिरंगाई, कौटुंबिक त्रास, अपघात, प्रिय जनांपासून होणारी फारकत, संततिसुखात बाधा येणे अशापैकी घटना घडणे संभवते. या राशीच्या पंचम स्थानी कन्या राशीत

प्रथमपासून मंगळ आहेच. त्याच्यामुळे संततीविषयक समस्या त्रस्त करण्याची शक्यता दिसते. या राशीच्या षष्ठ स्थानी तुळा राशीत केतु असून त्याच्यामुळे मनस्थिती उदार होईल, आरोग्य उत्तम राहील आणि आचारविचार उच्च राहतील. या राशीच्या दशम स्थानी कुंभ या स्वराशीत शनि असून तो कायदा, तत्वज्ञान, उच्च बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होईल. तसेच तो कोळसा,लोखंड यांचा व्यापार असणारांनाही अनुकुल व लाभदायक होईल. या राशीच्या लाभस्थानी मीन राशीत नेपच्यून असून त्याच्यामुळे आर्थिक समस्या अस्वस्थ करतील. कुमार्गी मित्रापासून नुकसान होईल व त्यामुळे नैराश्य येईल. या राशीच्या व्ययस्थानी मेष राशीत गुरु-राहू- हर्षल असे तीन ग्रह असून येथील गुरु-राहू अनुकुल होतील, पण हर्षलमुळे सांपत्तिक अडचणी, वाईट प्रसंग, शत्रुत्व निर्माण होणे, अपघात होणे अशापैकी घटना घडण्याची शक्यता दिसते. श्रद्धा असेल तर “शिवशंकराची” व “श्रीहनुमानाची “उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने “शिवलीलामृत स्तोत्रा”चे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी “हनुमानचालीसा स्तोत्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र कृत्तिका आहे त्यांनी “ओम अग्नये नमः:” तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र रोहिणी आहे त्यांनी “ओम ब्रह्माय नमः:” तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र मृग आहे त्यांनी “ओम सोमसोमाय नमः:” तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(३) मिथुन -** या राशीच्या धनस्थानी कर्क राशीत शुक्र असून तो कौटुंबिक सुख व कौटुंबिक प्रगतीस अनुकुल होईल व त्याच्यामुळे धनलाभ होणेही संभवते. या राशीच्या तृतीय स्थानी सिंह राशीत रवि -बुध असे दोन ग्रह असून येथील रवि महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या चतुर्थ स्थानी कन्या राशीत जात आहे. अशा परिस्थितीत तो महिन्याच्या पूर्वार्धात अनुकुल होईल व त्याच्यामुळे सर्व सुखकारक असेच घडेल. धनलाभ होणेही संभवते.आरोग्य उत्तम राहील, नोकरीत वरिष्ठ तुमच्या कार्यकुशलतेवर प्रसन्न होतील, क्वचित कोणाचा सन्मान होणे, कोणास एखादे उच्च पद प्राप्त होणेही संभवते. पण महिन्याच्या उत्तरार्धात हा रवि प्रतिकुल होईल व त्याच्यामुळे अनारोग्य,दु:ख, आर्थिक चिंता, कौटुंबिक त्रास, कार्यदिरंगाई अशा प्रकारच्या घटना घडणे संभवते. या राशीच्या तृतीय स्थानी असलेला बुधही संपूर्ण महिन्याच्या काळात प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे हितशत्रूंचा त्रास सहन करावा लागेलसे दिसते. शिवाय नव्याने शत्रुत्व होणेही संभवते. या राशीच्या चतुर्थ स्थानी कन्या राशीत प्रथमपासून मंगळ आहेच. तोही प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे कौटुंबिक जीवनात गैरसमज, वाद, भांडणे होणे, असमाधानकारक घटना घडणे संभवते. या राशीच्या पंचम स्थानी तुळा राशीत केतु असून त्याच्यामुळे या राशीच्या विद्यार्थ्याच्या शैक्षणिक प्रगतीत अडथळे निर्माण होणे संभवते. तसेच काही मंडळींना पोटाचा आजार त्रस्त करण्याची शक्यता दिसते. या राशीच्या भाग्यस्थानी कुंभ या स्वराशीत शनि असून तो वकिली, तत्त्वज्ञान, अन्य चिकित्सक बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होईल. काही मंडळींना दूरच्या प्रवासाचे योग येतील. या राशीच्या दशम स्थानी मीन राशीत नेपच्यून असून त्याच्यामुळे मनस्थिती अस्थिर राहील; पण तो मनोवैज्ञानिक आणि द्रव पदार्थ व्यापार करत असणारांना अनुकुल व लाभदायक होईल. या राशीच्या लाभस्थानी मेष राशीत गुरु -राहू-हर्षल असे तीन ग्रह असून येथील गुरु सर्व प्रकारे अनुकुलच होईल व त्याच्यामुळे इच्छाआकांक्षा पूर्ण होतील, अनेक मार्गानी धनलाभ होणेही संभवते. विवाहेच्छूना विवाहयोग येईल व या राशीच्या विद्यार्थ्याना सहज शैक्षणिक प्रगती करणे शक्य होईल. नवे मित्र मिळतील. येथील राहू मुळे ज्यांच्या हाती अधिकार आहे अशापैकी काही मंडळींना अधिकाराचा दुरुपयोग करून वाममार्ग धन मिळविण्याचा जबरदस्त मोह होईल. पण त्यांनी मनावर ताबा ठेवून तो विचार मनातून काढून टाकावा. नपेक्षा नुकसानच होईल .जपा. येथील हर्षलमुळे सर्व काही अनिश्चित असेच घडेल. त्याच्यामुळे मित्रांशी भांडणे होणे संभवते. श्रद्धा

असेल तर “श्रीशिवशंकरा”ची  व “श्रीदुर्गा देवी”ची उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने “शिवलीलामृत स्तोत्रा”चे व “श्रीदुर्गा देवी स्तोत्रा”:चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र मृग आहे त्यांनी “ओम सोमसोमाय नमः:” तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र  आर्द्रा आहे त्यांनी “ओम नमः: शंकराय  “ तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र पुनर्वसू आहे त्यांनी “ओम अदितीये नमः:” तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(४) कर्क -** या राशीच्या प्रथम(लग्न) स्थानी याच राशीत शुक्र असून त्याच्यामुळे कौटुंबिक व वैवाहिक जीवनातील सुखसमाधान लाभेल. या राशीच्या धनस्थानी सिंह राशीत रवि -बुध  असे दोन ग्रह असून येथील रवि महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या तृतीय स्थानी कन्या राशीत जात आहे. अशा परिस्थितीत तो महिन्याच्या पूर्वार्धात प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे आर्थिक चिंता त्रस्त  करतील व डोळ्याचे आजारही होणे संभवते. तसेच वाद, भांडणे होणेही संभवते. पण महिन्याच्या उत्तरार्धात तो अनुकुल होईल व त्याच्यामुळे आरोग्य उत्तम राहील, धनलाभ होणेही संभवते. तसेच सर्व प्रकारे सुखसमाधान लाभेल. नोकरीत वरिष्ठ तुमच्या कामावर संतुष्ट होतील व क्वचित कोणाचा सन्मान होणे, कोणास एखादे उच्च पद प्राप्त होणेही  संभवते. धनस्थानी असलेला बुध दु:खदायक असला  तरी धनदायकच होईल. या राशीच्या तृतीय स्थानी कन्या राशीत प्रथमपासून मंगळ आहेच. त्याच्यामुळे हिंमत, महत्त्वाकांक्षा वाढेल, हातून  कर्तृत्व घडेल, प्रवासयोग येईल, पण एखादी इजा होणेही संभवते. जपा. या राशीच्या चतुर्थ स्थानी तुळा  राशीत केतु असून त्याच्यामुळे कोणाशी पटणार नाही, कसली  तरी  चिंता अस्वस्थ करील, शिवाय तो विषभयकारकआहे. जपा. या राशीच्या अष्टम स्थानी कुंभ या स्वराशीत शनि असून तो अपघातकारक असल्यामुळे सतत सावधानतेने आचरण करा. शिवाय त्याच्यामुळे दु:ख, दैन्य, विचित्र आजार होणेही संभवते. या राशीच्या भाग्यस्थानी  मीन राशीत नेपच्यून असून तो आध्यात्मिक उपासनेस अनुकुल होईल. काही मंडळींना सूचक स्वप्ने पडतील तर काहींना परदेशगमनाची संधी मिळेल. या राशीच्या दशम स्थानी मेष राशीत गुरु-राहू-हर्षल असे तीन ग्रह असून येथील गुरु  बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होईल. .वरिष्ठ कामावर संतुष्ट होतील.  क्वचित कोणाचा सन्मान होणेही  संभवते. काही मंडळींना नवे आवडते कार्यक्षेत्र मिळू शकेल. येथील राहूही अनुकुल असून नोकरीत काही मंडळींना बढती, अधिकारपद मिळणे संभवते क्वचित कोणाचा सन्मानही होईल. येथील हर्षल उच्च बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होईल. श्रद्धा असेल तर “श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना” अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने  “बावन्न श्लोकी गुरुचरित्रा” चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र पुनर्वसू आहे त्यांनी “ओम अदितीये नमः:” तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र पुष्य आहे त्यांनी “ओम बृहस्पतये नमः:” तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र आश्लेषा आहे त्यांनी “ओम सर्पाय  नमः” तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(५) सिंह -** या राशीच्या  प्रथम(लग्न) स्थानी याच राशीत रवि -बुध  असे दोन ग्रह असून येथील रवि महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या धनस्थानी कन्या राशीत जात आहे. अशा परिस्थितीत तो संपूर्ण महिन्याच्या काळात प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे अनारोग, मनस्ताप, चिंता, थकवा येणे संभवते. तसेच आर्थिक समस्या अस्वस्थ करतील. या राशीच्या प्रथम स्थानी असलेला बुधही प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे मनस्थिती अस्थिर, चंचल होईल,  कुसंगतीची बाधा होणे संभवते. तसेच धननाश व मित्रद्रोह होणेही संभवते. या राशीच्या धनस्थानी असलेला मंगळही अनारोग्यकारक होईल व आर्थिक चिंता त्रस्त

करतील.या राशीच्या तृतीय स्थानी तुळा  राशीत केतु असून त्याच्यामुळे मानसिक दु:ख  अस्वस्थ करील. या राशीच्या  सप्तम स्थानी कुंभ  या स्वराशीत शनि  असून त्याच्यामुळे चित्तवृत्ती शांत राहील, पण विवाहेच्छूना विवाह योग येणे संभवत नाही. या राशीच्या अष्टम स्थानी मीन  राशीत नेपच्यून असून तो जलभयकारक व विषभयकारक असल्यामुळे खोल पाण्यात पोहावयास जाऊ नका. तसेच बाहेरचे उघड्यावरचे पदार्थ खाऊ  नका. या राशीच्या भाग्यस्थानी मेष राशीत गुरु-राहू-हर्षल असे तीन ग्रह असून येथील गुरुमुळे सद्गुणांची वाढ होईल, प्रगतीची संधी मिळेल, अध्यात्मात उपासनेद्वारे प्रगती होईल, प्रवास योग येईल व  काही मंडळींना प्रसिद्धी मिळू शकेल.  येथील राहूमुळे अनारोग्य होणे संभवते. पण त्याच्यामुळे सभाधीटपणाचा गुण विकसित होईल. काही मंडळींना फिरतीची नोकरी मिळू शकेल. येथील हर्षल शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होईल. तसेच त्याच्यामुळे काही मंडळीना दूरच्या प्रवासाचे तर काहींना परदेशगमनाचे योग संभवतात. या राशीच्या व्ययस्थानी कर्क राशीत शुक्र असून त्याच्यामुळे सुख, ऐषाराम, चैनीचा आनंद मिळू शकेल. श्रद्धा असेल तर “भगवान विष्णूची उपासना” अनुकुल  होईल व मन:शांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने “विष्णुसहस्रनाम स्तोत्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र मघा आहे त्यांनी “ओम पितराय नमः:” तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र पूर्वा आहे त्यांनी “ओम भगाय  नमः:” तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तरा आहे त्यांनी “ओम आर्यमे  नमः:”तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(६) कन्या -** या राशीच्या व्ययस्थानी सिंह राशीत रवि -बुध  असे दोन ग्रह असून येथील रवि महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या प्रथम(लग्न) स्थानी कन्या राशीत येत आहे. त्यामुळे रवि महिन्याच्या संपूर्ण काळात   प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे  प्रतिकुल परिस्थिती निर्माण होईल व शरीरपीडा, अनारोग्य, मनस्ताप, चिंताग्रस्तपणा अशा प्रकारच्या घटना घडणे संभवते. व्ययस्थानी असलेला बुधही  प्रतिकुलच होईल व त्यामुळे अनारोग्य होणे, मानहानी होणे, हाती घेतलेल्या कार्यात अपयश येणे संभवते. प्रथम स्थानी याच राशीत असलेला मंगळही प्रतिकूलच होईल व त्याच्यामुळे स्वभाव हट्टी होईल, अकारण श्रम, दगदग कराल, त्यामुळे शरीरपीडा होईल. या राशीच्या धनस्थानी तुळा  राशीत केतु असून त्याच्यामुळे आर्थिक चिंता त्रस्त  करतील. या राशीच्या षष्ठ स्थानी  कुंभ या स्वराशीत  शनि असून त्याच्यामुळे अनारोग्य होणे, गैरसमजुतीने प्रतिकुल परिस्थिती निर्माण होणे, भांडणे होणे,  शत्रुत्व निर्माण होणे संभवते. पण तो दशम या व्यवसाय स्थानास पूरक होईल. या राशीच्या सप्तम स्थानी मीन  राशीत नेपच्यून असून त्याच्यामुळे विवाहितांच्या वैवाहिक जीवनातील  सुखात बाधा येणे संभवते.  या राशीच्या अष्टम स्थानी मेष राशीत गुरु-राहू-हर्षल असे तीन ग्रह असून येथील गुरुमुळे ज्यांच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभ योग आहे अशापैकी काही मंडळीनाअसाअचानक धनलाभ होणे संभवते. काही मंडळींना वारसा हक्काने धनलाभ होईल. येथील राहूमुळे अनारोग्य होणे संभवते. तसेच येथील हर्षल अपघातकारक  असल्यामुळे सतत सावधानतेने आचरण करणे अगत्याचे होईल. या राशीच्या लाभस्थानी  कर्क राशीत शुक्र असून तो सुखकारक व धनदायक होईल. श्रद्धा असेल तर “शिवशंकराची उपासना” अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. त्यासाठी  दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने “शिवलीलामृत स्तोत्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तरा आहे त्यांनी “ओम आर्यमे नमः:” तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र हस्त  आहे त्यांनी “ओम सूर्याय  नमः:” तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र चित्रा आहे त्यांनी “ओम त्वष्टे नमः:” तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(७) तुळा -** या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी याच राशीत केतु असून तो सुख,ऐषारामदायक असला तरी तो वाहनधोकादायक असल्यामुळे रस्त्याने जाताना सतत सावधानतेने आचरण करा. या राशीच्या पंचम स्थानी कुंभ या स्वराशीत शनि असून त्याच्यामुळे स्वभाव संशयी, स्वार्थी, व्यवहारी असा होईल; पण त्याच्यामुळे चिकाटीचा गुण वाढेल. या राशीच्या षष्ठ स्थानी मीन राशीत नेपच्यून असून त्याच्यामुळे उगीचच एखादी आजारभावना किंवा काल्पनिक चिंता अस्वस्थ करील. शिवाय काही मंडळींना फसवणूक झाल्याचा त्रास सहन करावा लागेल. या राशीच्या सप्तम स्थानी मेष राशीत गुरु-राहू-हर्षल असे तीन ग्रह असून येथील गुरूमुळे ज्यांचे प्रेमसंबंध आहेत ते दृढ होतील. विवाहेच्छूंना विवाहयोग येईल, नवे स्नेहसंबंध जुळून येतील, अर्थलाभ होईल व प्रवासयोग येणे संभवते. पण या स्थानी असलेले राहू व हर्षल हे दोन्ही ग्रह प्रतिकुलच होतील व त्यांच्यामुळे गुरुमुळे मिळणाऱ्या सर्व सुखात बाधा निर्माण होण्याची शक्यता जाणवते. राहूमुळे मनात कपटी विचार येतील, व भागीदारीत व्यापार व्यवसाय असणारांच्या व्यवसायात वाद, संशय, गैरसमज अशापैकी कारणांनी भागीदारीत बाधा येणे संभवते. या राशीच्या दशम स्थानी कर्क राशीत शुक्र असून तो प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे नोकरी-व्यवसायात अडचणी, त्रास, दु:ख सहन करावे लागेलसे दिसते. या राशीच्या लाभस्थानी सिंह राशीत. रवि -बुध असे दोन ग्रह असून येथील रवि महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या व्ययस्थानी कन्या राशीत जात आहे. अशा परिस्थितीत तो महिन्याच्या पूर्वार्धात अनुकुल होईल व त्याच्यामुळे आरोग्य उत्तम राहील, अर्थलाभ होणेही संभवते, व्यवसायात वाढ होईल, नोकरीत बढती मिळू शकेल. पण महिन्याच्या उत्तरार्धात त्याच्यामुळे प्रतिकुल परिस्थिती निर्माण होईल व शरीरपीडा, मानभंग होणे संभवते. तसेच या राशीच्या व्ययस्थानी असलेला मंगळही प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे वाद, भांडणे, अनारोग्य, मानहानी, चिंता, अन्य समस्या अशापैकी कारणांनी होणारा मनस्ताप सहन करावा लागेल. श्रद्धा असेल तर श्रीशिवशंकराची व श्रीहनुमानाची उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने "शिवलीलामृत स्तोत्रा"चे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी "हनुमानचालीसा स्तोत्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र चित्रा आहे त्यांनी "ओम त्वष्टे नमः:" तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र स्वाती आहे त्यांनी "ओम वायवे नमः:" तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र विशाखा आहे त्यांनी "ओम इंद्राग्नये नमः:" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(८) वृश्चिक -** या राशीच्या चतुर्थ स्थानी कुंभ या स्वराशीत शनि असून त्याच्यामुळे गृहसौख्य हानी होण्याची शक्यता दिसते. जपा. त्यामुळे नैराश्य येईल. या राशीच्या पंचम स्थानी मीन राशीत नेपच्यून असून त्याच्यामुळे मनस्थिती अति भावनाशील होईल व अध्यात्म आणि गूढ संशोधन यांची आवड असणारांना तो अनुकुल व प्रगतिकारक होईल. या राशीच्या षष्ठ स्थानी मेष राशीत गुरु -राहू-हर्षल असे तीन ग्रह असून येथील गुरुमुळे आरोग्य सुधारेल. येथील राहू परधर्मियांशी व्यावसायिक संबंध असणारांना अनुकुल व लाभदायक होईल. पण त्याच्यामुळे अनारोग्य होणेही संभवते. तसेच येथील हर्षलमुळे अनारोग्य होईल, मनस्थिती अस्थिर, चंचल होईल व त्याच्यामुळे डोकेदुखी किंवा मेंदूविकार होणे संभवते. त्यामुळे सतत अति विचार करू नका. या राशीच्या भाग्यस्थानी कर्क राशीत शुक्र असून त्याच्यामुळे गुरुकृपा, थोरकृपा, ऐषाराम लाभेल व काही मंडळींना कीर्ति, प्रसिद्धी मिळणेही संभवते. . या राशीच्या दशम या व्यवसाय स्थानी रवि -बुध असे दोन ग्रह असून येथील रवि महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या लाभस्थानी कन्या राशीत जात आहे अशा परिस्थितीत रवि -बुध हे दोन्ही ग्रह अनुकुलच होतील व रविमुळे नोकरी-व्यायसायात प्रगती होईल, अर्थलाभ होईल व काही मंडळींचा मानसन्मान होणेही संभवते. बुधामुळे कौटुंबिक व मानसिक सुखसमाधान लाभेल. या राशीच्या लाभस्थानी कन्या राशीत असलेला मंगळ प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे मित्रांशी वितुष्ठ येणे

संभवते. कष्ट -परिश्रम करूनच अर्थलाभ होईल. पण त्याच्यामुळे काही मंडळींना एखाद्या मौल्यवान वस्तूचा लाभ होणेही संभवते. या राशीच्या व्ययस्थानी तुळा राशीत केतू असून त्याच्यामुळे स्वभाव अस्थिर, लहरी होणे संभवते. श्रद्धा असेल तर श्रीगणेश व श्रीहनुमान यांची उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने "गणेश अथर्वशीर्ष स्तोत्रा"चे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी "हनुमानचालीसा स्तोत्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र विशाखा आहे त्यांनी "ओम इंद्राग्नये नमः:" तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र अनुराधा आहे त्यांनी "ओम मित्राय नमः:" तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र ज्येष्ठा आहे त्यांनी "ओम इंद्राय नमः:" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(९) धनु -** या राशीच्या तृतीय स्थानी कुंभ या स्वराशीत शनि असून त्याच्यामुळे काही मंडळींना उत्तम नोकरी मिळेल; तर काहींना आवडते कार्यक्षेत्र मिळू शकेल. पण त्याच्यामुळे भावंडविषयक कसली तरी चिंता त्रस्त करण्याची शक्यता दिसते. या राशीच्या चतुर्थ स्थानी मीन राशीत नेपच्यून असून त्याच्यामुळे घरगुती शांत परिस्थितीत गैरसमज, वाद, घोटाळे अशापैकी कारणांनी अशांत वातावरण होणे संभवते. या राशीच्या पंचम स्थानी मेष राशीत गुरु-राहू-हर्षल असे तीन ग्रह असून येथील गुरुमुळे आरोग्य उत्तम राहील,व तो लेखन व्यवसाय असणारांना, सर्व प्रकारच्या बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल व प्रगतिकारक होईल. येथील राहू प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे वैवाहिक जीवनात, संततिसुखात बाधा निर्माण होणे संभवते. आणि या राशीच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीत अडथळे, अडचणी निर्माण होण्याची शक्यताही जाणवते. येथील हर्षल कालापोषक असून तो उच्च बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होईल. या राशीच्या अष्टम स्थानी कर्क राशीत शुक्र असून तो या राशीच्या वृद्धाना प्रतिकुल होईल; पण त्याच्यामुळे ज्यांच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभ योग आहे अशापैकी काहींना असा अचानक धनलाभ होणे संभवते. काही मंडळींना वारसा हक्काने धनलाभ होणे संभवते. या राशीच्या भाग्यस्थानी सिंह राशीत रवि -बुध असे दोन ग्रह असून येथील रवि महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या दशम स्थानी कन्या राशीत जात आहे. अशा परिस्थितीत तो महिन्याच्या पूर्वार्धात प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे भय, मानसिक ताण, निराशा, वडील मंडळींचा विरोध सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. पण महिन्याच्या उत्तरार्धात तो नोकरी-व्यवसाय असणारांना अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. या राशीच्या भाग्य स्थानी असलेल्या बुधामुळे वाद, भांडणे, नियोजित कार्यात अडचणी, अडथळे, दिरंगाई निर्माण होणे संभवते. या राशीच्या दशम स्थानी कन्या राशीत प्रथमपासून मंगळ आहेच. त्याच्यामुळे नोकरदार मंडळींना नोकरीत कामाचा ताण, वरिष्ठांचा जाच सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. स्वतंत्र व्यवसाय असणारांच्या व्यवसायात खळबळजनक घटना घडतील, काही मंडळींना हातचे सोडून नवीन काही करावेसे वाटेल. पण हा मंगळ औषधविक्रेत्यांना अनुकुल व लाभदायक ठरू शकेल. या राशीच्या लाभस्थानी तुळा राशीत केतू असून तो अनुकुल होईल व त्याच्यामुळे नियोजित कार्यात यश मिळेल, सुखोपभोग मिळेल, अर्थलाभ होईल व प्रवासाचे योग येतील. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने "बावन्न श्लोकी गुरुचरित्रा"चे पठण करा. तसेच दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र मूळ आहे त्यांनी "ओम निऋतये नमः:" तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र पूर्वाषाढा आहे त्यांनी "ओम उदकाय नमः:" तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तराषाढा आहे त्यांनी "ओम विश्वेदेवाय नमः:" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(१०) मकर -** या राशीच्या धनस्थानी कुंभ या स्वराशीत शनि असून तो संपूर्ण महिन्याच्या काळात प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे कुटुंबात अनिष्ट घटना घडण्याची शक्यता जाणवते. तसेच आर्थिक समस्याही त्रस्त करण्याची शक्यता जाणवते. या राशीच्या तृतीय स्थानी मीन राशीत नेपच्यून असून तो अध्यात्म आणि गूढ संशोधन कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल व प्रगतिकारक होईल. या राशीच्या चतुर्थ स्थानी मेष राशीत गुरु -राहू-हर्षल असे तीन ग्रह असून येथील गुरुमुळे कौटुंबिक सुखसमाधान लाभेल, काही मंडळींचे स्थावर खरेदी-विक्रीचे व्यवहार अपेक्षेनुसार पार पडतील, पण नातेसंबंधातील कोणाकडून तरी मनस्ताप दिला जाण्याची शक्यता जाणवते. येथील राहूही कौटुंबिक सुखाचे दृष्टीने प्रतिकुलच होईल. तसेच येथील हर्षलमुळे कोणाशी पटणार नाही, कशातच सुखसमाधान वाटणार नाही, सतत तक्रारी करत राहाल, वास्तुसुखही मिळणार नाही. या राशीच्या सप्तम स्थानी कर्क राशीत शुक्र असून त्याच्यामुळे प्रेमिकांचे प्रेमविवाह पार पडतील, विवाहितांना वैवाहिक जीवनातील सुखसमाधान लाभेल, या राशीच्या अष्टम स्थानी सिंह राशीत रवि -बुध असे दोन ग्रह असून येथील रवि प्रतिकुल होणार असून त्याच्यामुळे अनारोग्य, दु:ख, अपयश, इच्छाआकांक्षा अपूर्ण राहण्याची दाट शक्यता दिसते. तसेच संततिसुखात बाधा येणे संभवते.महिन्याच्या उत्तरार्धात हा रवि या राशीच्या भाग्यस्थानी जात असून त्या काळातही तो प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे मानसिक ताण, भय, निराशा, येऊन मन अस्वस्थ होईल. तसेच वडील मंडळींचा विरोधही सहन करावा लागेल. पण येथील बुधामुळे नियोजित कार्यसिद्धी होऊन यश मिळेल. व सुखसमाधान लाभेल. या राशीच्या भाग्यस्थानी कन्या राशीत प्रथमपासून मंगळ आहेच. त्याच्यामुळे प्रवासात मनस्ताप,मानहानी होणे संभवते. म्हणून शक्यतो प्रवास करू नका. या राशीच्या दशम स्थानी तुळा राशीत केतु असून त्याच्यामुळे दिखाऊ, ढोंगी, धूर्त आचरण कराल. तसेच त्याच्यामुळे संततिसुखात बाधा येणे संभवते. श्रद्धा असेल तर शिवशंकराची आणि श्रीहनुमानाची उपासना अनुकुल होईल व मन:शांति लाभेल. :त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने "शिवलीलामृत स्तोत्रा"चे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी "हनुमानचालिसा स्तोत्रा "चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तराषाढा आहे त्यांनी "ओम विश्वेदेवाय नमः:" तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र श्रवण आहे त्यांनी "ओम विष्णवे नमः:" तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र धनिष्ठा आहे त्यांनी "ओम वसवे नमः:" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(११) कुंभ -** या राशीच्या प्रथम (लग्न)स्थानी याच राशीत शनि असून तो अनारोग्यकारकच होईल. त्याच्यामुळे नियोजित कार्यात अडचणी, अडथळे, दिरंगाई झाल्यास .नैराश्य येईल. कुटुंबातील प्रिय जनापैकी कोणाचे दूरत्व निर्माण झाल्यास मन अस्वस्थ होईल. पण काही मंडळींना दूरच्या प्रवासाचे योग येणे संभवते. या राशीच्या धनस्थानी मीन राशीत नेपच्यून असून त्याच्यामुळे आर्थिक समस्या त्रस्त करतील. या राशीच्या तृतीय स्थानी मेष राशीत गुरु-राहू-हर्षल असे तीन ग्रह असून येथील गुरु साहित्य निर्मितीचे लेखन करणाऱ्या लेखकांना अनुकुल होईल, प्रवास, यात्रा योग संभवतो. पण भावंडांपैकी कोणाकडून तरी मनस्ताप दिला जाण्याची शक्यता जाणवते. येथील राहूमुळे हातून कर्तृत्व घडेल; पण बंधुसुखात बाधा येणे संभवते. येथील हर्षलमुळे स्मरणशक्ती, आकलनशक्ती वाढेल, व तो उच्च बौद्धिक आणि शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होईल. काही मंडळींना परदेशगमनाची संधी मिळेल. या राशीच्या षष्ठ स्थानी कर्क राशीत शुक्र असून त्याच्यामुळे सर्व प्रकारच्या कलाकारांची आपापल्या कलेत उच्च प्रगती असूनही कलेतील कसब प्रकट करण्यास संधीच मिळणार नाही. या राशीच्या सप्तम स्थानी सिंह राशीत रवि -बुध असे दोन ग्रह असून येथील रवि महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या अष्टम स्थानी कन्या राशीत जात आहे. अशा परिस्थितीत तो महिन्याच्या संपूर्ण काळात प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे अनारोग्य होईल, इच्च्छाआकांक्षा अपूर्ण

राहतील, संततिसुखात बाधा येईल, पण तो पूर्वार्धात केंद्रस्थानी असल्यामुळे भाग्योदयकारक होणेही संभवते. या राशीच्या सप्तम स्थानी असलेला बुधही प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे दु:ख सहन करावे लागेल व भांडणे होणे संभवते. या राशीच्या अष्टम स्थानी कन्या राशीत प्रथमपासून मंगळ आहेच. पण तो जलभयकारक व वीजभयकारक असल्यामुळे खोल पाण्यात पोहावयास जाऊ नका. तसेच विजेवर चालणारी उपकरणे सावधानतेने हाताळा. शिवाय त्याच्यामुळे अनारोग्य होणे, हाडमोड होणेही संभवते. या राशीच्या भाग्यस्थानी तुळा राशीत केतू असून त्याच्यामुळे धूर्त, ढोंगी, दिखाऊ आचरण कराल. तसेच त्याच्यामुळे संततिसुखात बाधा येणे संभवते. श्रद्धा असेल तर शिवशंकराची व श्रीहनुमानाची उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने “शिवलीलामृत स्तोत्रा”चे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी “हनुमानचालीसा स्तोत्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र धनिष्ठा आहे त्यांनी “ओम वसवे नमः:” तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र शततारका आहे त्यांनी “ओम वरुणाय नमः:” तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र पूर्वाभाद्रपदा आहे त्यांनी “ओम अजैकचरणाय नमः:” तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(१२) मीन -** या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी याच राशीत नेपच्यून असून त्याच्यामुळे मनस्थिती अत्यंत कोमल होईल व मानसिक संवेदना अति जलद होतील. त्यामुळे नैराश्य येणे संभवते. या राशीच्या धनस्थानी मेष राशीत गुरु -राहू-हर्षल असे तीन ग्रह असून येथील गुरुमुळे उत्तम अर्थलाभ होईल, कुटुंबात शुभ घटना घडतील, स्वतंत्र व्यवसाय असणारांच्या व्यवसायात प्रगती व वाढ होईल. पण येथील राहू व हर्षल हे दोन्ही ग्रह प्रतिकुलच होतील व गुरुमुळे मिळणाऱ्या सर्व अनुकुल गोष्टीत बाधा निर्माण होणे संभवते. येथील हर्षलमुळे स्वभाव अति चंचल, अस्थिर, लहरी असा घडेल व आपल्या फटकळ बोलण्याने समोरच्याचा अपमान होत आहे हेही ध्यानात येणार नाही. या राशीच्या पंचम स्थानी कर्क राशीत शुक्र असून त्याच्यामुळे सर्व प्रकारच्या कलाकारांना आपल्या कलेत प्रगती करणे शक्य होईल. व समाधान वाटेल. या राशीच्या षष्ठ स्थानी सिंह राशीत रवि -बुध असे दोन ग्रह असून येथील रवि महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या सप्तम स्थानी कन्या राशीत जात आहे. अशा परिस्थितीत महिन्याच्या पूर्वार्धात तो दशम या व्यवसाय स्थानास पूरक होईल, हितशत्रू पराभूत होतील व शांती लाभेल. पण त्याच्यामुळे अनारोग्य होणेही संभवते. पण महिन्याच्या उत्तरार्धात तो प्रतिकुल होणार असला तरी तो केंद्रस्थानी असल्यामुळे भाग्योदयकारक होणे संभवते. या राशीच्या षष्ठ स्थानी सिंह राशीत असलेला बुध अनुकुल होईल व त्याच्यामुळे कार्यसिद्धी होईल व काही मंडळींना कीर्ती, प्रसिद्धी मिळू शकेल. धनलाभ होणेही संभवते. या राशीच्या सप्तम स्थानी कन्या राशीत प्रथमपासून मंगळ आहेच. त्याच्यामुळे स्वतः:चे किंवा जीवनसंगिनीचे अनारोग्य, दोघांतील वाद, मतभेद, भांडणे अशापैकी कारणांनी वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. भागीदारीत व्यापार-व्यवसाय असणारांनी संशय, गैरसमज अशापैकी कारणांनी भागीदारीत बाधा येणार नाही याची काळजी घ्यावी. या राशीच्या अष्टम स्थानी तुळा राशीत केतू असून तो प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे अनारोग्य होणे, कुटुंबात कलह निर्माण होणे, अपघात होणे संभवते. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने “बावन्न श्लोकी गुरुचरित्र स्तोत्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र पूर्वाभाद्रपदा आहे त्यांनी “ओम अजैकचरणाय नमः:” तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तराभाद्रपदा आहे त्यांनी “ओम अहिर्बुध्न्याय नमः:”तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र रेवती आहे त्यांनी “ओम पूषाय नमः:” तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

=====ooooo0ooooo=====